मुंबई - शुक्रवार दि.2 मार्च 2012

“मुंबई उपनगरी रेल्वेसाठी 2012-2013 च्या अर्थसंकल्पात एक हजार कोटीची तरतूद करावी, चर्चगेट ते डहाणू लोकल तातडीने सुरु करावी, याशिवाय पश्चिम रेल्वेचा विद्युत प्रवाह डीसी ऐवजी एसी मध्ये परावर्तित झाल्यामुळे लोकल गाडया 80 ऐवजी 100 किलोमीटर दर ताशी धावू शकत असल्यामुळे नवीन वेळापत्रक तयार करावे, तसेच 72 लाख उपनगरी प्रवाशांसाठी चालू असलेल्या रेल्वे प्रकल्पांच्याबद्दल श्वेतपत्रिका प्रसिध्द करावी” अशा चार मागण्या भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज रेल्वे मंत्री श्री.दिनेश त्रिवेदी यांच्यासमोर करण्यात आल्या. माजी रेल्वे राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या शिष्टमंडळामध्ये माजी उपमहापौर श्री.रमेश मेढेकर आणि डहाणूच्या माजी नगराध्यक्षा आणि नव्याने मुंबईत निवडून आलेल्या नगरसेविका श्रीमती मनिषा चौधरी यांचा समावेश होता. चर्चेच्यावेळी रेल्वे राज्यमंत्री श्री.मुनीअप्पा तसेच रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष, पश्चिम आणि मध्ये रेल्वेचे महाव्यवस्थापक, मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक आणि राज्याचे मुख्य सचिव श्री.रत्नाकर गायकवाड यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

रेल्वे मंत्री श्री.दिनेश त्रिवेदी यांच्याशी झालेल्या चर्चेसंबंधी अधिक माहिती देताना श्री.राम नाईक म्हणाले की आठ वर्षानंतर मुंबईच्या उपनगरी प्रवाशांच्या भेटीसाठी प्रथमच रेल्वे मंत्री आले. गेल्या 8 वर्षात उपनगरी प्रवाशांची संख्या 72 लाखापर्यंत वाढली, इतकेच नव्हे तर उपनगरी रेल्वेवर रोज सरासरी दहाजणांचा अपघाती मृत्यु होत आहे. या आठ वर्षात जुलै 2005 मध्ये अभूतपूर्व जलवृष्टी आणि 2006 मध्ये चालत्या गाडयांमध्ये बॉम्बस्फोटासारख्या घटना घडल्या. तथापि कॉंग्रेस आघाडी सरकारच्या रेल्वे मंत्र्यांनी मुंबईकडे दुर्लक्ष केले. यापुढे मंबईच्या प्रवाशांच्या समस्यांकडे अधिक आत्मीयतेने लक्ष देण्याची केलेली विनंती रेल्वे मंत्री श्री.दिनेश त्रिवेदी यांनी मान्य केली.

वरील चार मागण्यांशिवाय 9 डब्यांच्या सर्व गाडया 12 डब्यांच्या करण्यात याव्यात, पश्चिम रेल्वेवर एक अधिक महिला विशेष गाडी तर मध्य रेल्वेसाठी दोन विशेष महिला गाडया सुरु करण्यात याव्यात. एमयुटीपी-1 आणि एमयुटीपी-2 मध्ये रखडलेल्या सर्व प्रकल्पांना गती देण्यात यावी, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिला यांच्यासाठी विशेष आसनांची व्यवस्था करावी. आदी मागण्याही करण्यात आल्या.

भारतीय जनता पार्टीच्या शिष्टमंडळाने केलेल्या मागण्या या वास्तववादी असून त्याचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन निर्णय घेतला जाईल असे आश्वासन रेल्वे मंत्री श्री.दिनेश त्रिवेदी यांनी चर्चेचा समारोप करताना दिले.

( निरंजन शेट्टी )
प्रसिध्दी प्रमुख